दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com ● मुख्य संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com
● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार दि.२४ ऑक्टोबर २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक -६७ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या ३८ उमेदवारांची घोषणा

# बारामतीमधून अजित पवार तर परळीत धनंजय मुंडे रिंगणात

मुंबई (वृत्तसंस्था)-विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी आपल्या ३८ उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. यामध्ये सर्वाधिक उत्सुकता होती ती बारामती विधानसभा मतदारसंघाची. आता अजित पवार हेच बारामती विधानसभा मतदारसंघातून एनसीपीचे उमेदवार असतील अशी घोषणा तटकरे यांनी केली. याबरोबरच येवल्यातून छगन भुजबळ तर परळीतून धनंजय मुंडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.



अजित पवारांच्या या यादीमध्ये नवाब मलीक आणि सुनील टिंगरे यांच्या नावाचा समावेश नाही. तर विद्यमान आमदार आणि मंत्र्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. यात छगन भुजबळ यांना पुन्हा एकदा येवला मतदार संघातून निवणुकीच्या रिंगणात उतरवण्यात आले आहे. वास्तविक राज्यात सुरु असलेल्या मराठा आरक्षणाच्या पार्श्वभूमीवर भुजबळ विरुद्ध मनोज जरांगे यांच्यातील वाद समोर आला होता. त्यामुळे आता या मतदार संघातून भुजबळ यांच्या निवडणुकीकडे सर्वांचेच लक्ष असेल. तर दुसरीकडे राज्यातील विद्यमान मंत्री दिलीप वळसे पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, धर्मराव बाबा आत्राम, आदिती तटकरे, अनिल पाटील, संजय बनसोडे यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे.अजित पवार गटाच्या ३८ उमेदवारांच्या पहिल्या यादीत माजी कॅबिनेट मंत्री नवाब मलिक, नाशिक जिल्ह्यातील निफाड मतदार संघाचे आमदार दिलीप बनकर, तर पुण्यातील आमदार सुनील टिंगरे यांच्या नावाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे या विद्यमान आमदारांचा पत्ता कट झाला का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. यात नवाब मलिक यांना भाजपचा विरोध आहेत तर पुण्यातील हिट अँड रन प्रकरणात सुनील टिंगरे यांचे नाव समोर आल्यानंतर महायुतीला विरोधकांच्या टीकेला तोंड द्यावे लागले होते. त्यामुळे आता अजित पवार या तिन्ही आमदारांचा पत्ता कट करणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.राष्ट्रवादीने आपल्या पहिल्याच यादीत आपल्या सर्व ९ मंत्र्यांना उमेदवारी जाहीर केली आहे. या मंत्र्यांत अजित पवारांसह, धनंजय मुंडे, दिलीप वळसे पाटील, छगन भुजबळ, आदिती तटकरे, अनिल पाटील, हसन मुश्रीफ, संजय बनसोडे व धर्मरावबाबा आत्राम यांचा समावेश आहे.

## आसमानी संकटाच्या तडाख्यात शेतकरी भरडला

# गेल्याने नुकसान भरपाई,अग्रीम पिक विमा द्यानुकसान ग्रस्त शेतकर्याची मागणी

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

गंगापूर तालुक्यात नुकताच परतीच्या पावसाने हाहाकार घातला आहे.नुकसानग्रस्त शेतकर्याच्या वतीने खरिप २०२४-२५ हंगामात अनेकदा अवकाळी पावसाने शेत मालाचे नुकसान झाले आहे.परंतु गंगापुर महसुल प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने अतिवृष्टी नुकसान भरपाई तालुक्यात कोणत्याही मंडळाला लागु झाली नसल्याचे शेतकऱ्यांनी मंगळवार दि.२२ रोजी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.परंतु महसूल प्रशासनाने चुकीचे पंचनामे करून आणेवारी ५१ च्या वर दाखवली गेल्याने पिक विमा मिळतो की नाही अशीच शंका शेतकरी कृती समितीने आपल्या निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.या प्रसंगी शेतकऱ्यांनी तहसीलदार नवनाथ वगवाड यांना शेतकरी कृती समितीच्या वतीने इंजी.महेश गुजर, राहुल



ढोले,आणासाहेब जाधव यांनी निवेदन दिले आहे की ऐन दिवाळीचा सण जवळ आला असताना परतीच्या पावसाने तालुक्यात दमदार हजेरी लागली आहे. बहुतांश तलाव धरणे बंधारे भरली असली तरी खरिप हंगामात काढणीला आलेली कापुस, सोयाबीन, तुर, मका व इतर पिकांचे १००%नुकसान झाले आहे .तरी जिल्हा प्रशासनाने किंवा पिक विमा कंपनीने नुकसान भरपाई मिळेल असे साधे आश्वासन दिले नसल्याने आम्हा शेतकऱ् कडे आत्महत्या केल्या शिवाय पर्याय नसल्याने दि ३० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता विष प्राशन करण्यात येणार आहे याची आपण गाभिंर्याने दखल घ्यावी असे शेतकऱ्यानी तहसीलदारांना निवेदनाद्वारे सांगितले आहे.

खालील मागण्या मान्य केल्यास आत्महत्या स्तगीत करणार

१) खरिप हंगामातील सर्व मंडळाचे पर्जन्यमान आकडेवारी जाहीर करावी

२) सर्व मंडळातील पिक विमा धारकांना अग्रीम रक्कम देण्यात यावी

३) जिल्हा प्रशासनाने संपुर्ण गंगापुर तालुक्यातील नुकसान भरपाई साठी हेक्टर २७००० रूपये प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात यावी.

४) डोणगाव मंडळाचे पर्जन्यमान यंत्रणा सदोष असल्याने डोणगाव मंडळा सह सर्व मंडळाची आणेवारी ५० पेक्षा कमी करावी.

## अनुवंशिक बदलातील परीमान शोधणारे जीवरासायनिक विश्लेषक यंत्र

### डॉ नवनाथ काशीद यांना युकेचे पेटेंट

**केज । सचिन भालेराव**

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस संचलित, बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज, येथील वनस्पतीशास्त्र विषयातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. नवनाथ काशीद, यांच्या नावीन्यपूर्ण अशा अनुवंशिक बदलातील परिमाण शोधणारे जीव रासायनिक विश्लेषक यंत्र या नवनिर्मित उपकरणास णघ युनायटेड किंग्डम कडून पेटंटच्या माध्यमातून मान्यता देण्यात आलेली आहे. डॉ.नवनाथ काशीद व त्यांचे सहकारी यांच्या संयुक्त उपक्रमातून प्राणी व वनस्पती मधील घडून येणार अनुवंशिक बदल, त्याचे परिमाण शोधण्यासाठी जीव रासायनिक विश्लेषक यंत्र याची निर्मिती केली आहे. या यंत्राच्या उपयोगाने संशोधक विद्यार्थी, प्रयोगशाळा मध्ये कार्यरत असणारे अध्ययनार्थी यांना हे सर्व बदल एकच विश्लेषक यंत्राच्या माध्यमातून शोधणे सोयीस्कर होणार आहे . डॉ नवनाथ काशीद व त्यांच्या सहकारी संशोधक बांधवांचे संस्थेच्या वतीने



श्री रमेशरावजी आडसकर , सचिव श्रीमती अर्चनाताई आडसकर संचालिका, श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था आडस तसेच बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव फावडे व सर्व कर्मचारी प्राध्यापक बंधूंच्या वतीने अभिनंदन करण्यात आले आहे.

# अंबाजोगाईत २७ ऑक्टोबर रोजी शिक्षक कवी संमेलनाचे आयोजन

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

मसाप शाखा अंबाजोगाईच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलन पूर्व उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेले कवी संमेलन २७ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले असून या कवी संमेलनात शिक्षक कवींनी सहभागी व्हावे असे आवाहन मसापचे अध्यक्ष दगडू लोमटे, स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार आणि संयोजक विजय रापतवार यांनी केले आहे. ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलना निमित्त संमेलन पूर्व उपक्रमांतर्गत यापुर्वी कथालेखन कार्यशाळा, गजल लेखन कार्यशाळा या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याशिवाय व्यक्तिचित्रण लेखन स्पर्धा आणि हस्तलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या सोबतच आता २७ ऑक्टोबर रविवार रोजी शिक्षक कवी संमेलनाचे आयोजन केले आहे. शिक्षकांमध्ये असलेल्या साहित्य कलेस वाव देण्यासाठी, शिक्षकांमध्ये दडलेल्या कवीतांना समाजासमोर आणण्यासाठी तसेच शिक्षकांमधील साहित्य कला वाढीस लागावी, या उद्देशाने या संमेलनाचे आयोजन केले आहे. या कवी संमेलनात अंबाजोगाई शहरात राहणाऱ्या सर्व शिक्षकांना सहभाग घेता येणार आहे. उत्कृष्ट कविता सादर करणाऱ्या तीन कवींचा ११ अंबाजोगाई साहित्य ११ व्या आंबाजोगाई साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येईल. सादर केल्या जाणाऱ्या कवितांची प्रत (टाईप केलेली) संयोजकांना द्यावी लागेल. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. सहभागी होणाऱ्या कवींना स्वतःच्या कवितेचे सादरीकरण करावे लागेल. कवितेला विषयाचे बंधन नसेल. कविता कोणाच्याही धार्मिक जातीय भावना दुखवणारी अथवा कोणाचे मन दुखावेल अशी वैयक्तिक टीकाटिप्पणी करणारी नसावी. कवितेला भाषेचे बंधन नाही, मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी वा अन्य कोणत्याही भाषेत असली तरी चालेल. सहभागी कवींना जास्ती जास्त दोन कविता सादर करता येतील. कविता सादरीकरण हे संयोजनाकडून दिलेल्या वेळेतच पुर्ण करावे लागेल. कवी संमेलनात सहभागी होण्यासाठी शिक्षक कवींनी आपले नाव व शाळेचे विजय रापतवार (संयोजक) ७०३८५८७२४८ या क्रमांकावर नोंदवावीत असे आवाहन संयोजकांनी केले आहे

# तबला वादनात पारितोषिक पटकावणाऱ्या हरिप्रसाद पांडेंचा सत्कार

**नायगाव । हनुमंत चंदनकर**

युवक महोत्सव २०२४ मध्ये तबला वादन मध्ये प्रथम तर शास्त्रीय ताल वादनात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले बद्दल शरदचंद्र महाविद्यालय नायगाव बा. येथे मंगळवारी तबलावादक तथा विद्यार्थी हरिप्रसाद पांडे याचे प्राचार्य के हरिबाबुच्या हस्ते सन्मान पूर्वक सत्कार करून कौतुकाची थाप मारण्यात आली.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व सहयोग सेवाभावी संस्था कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णुपुरी नांदेड यांच्या वतीने आयोजित युवक महोत्सव ज्ञानतीर्थ २०२४ आयोजित शास्त्रीय तालवाद्य या स्पर्धेमध्ये शरदचंद्र कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय नायगाव येथील बीकॉम तृतीय वर्षाचा विद्यार्थी हरिप्रसाद बाळासाहेब पांडे याने द्वितीय क्रमांक पटकावला आहे. महाविद्यालयाच्या वतीने युवक महोत्सव २०२४ मध्ये एकूण बारा प्रकारांमध्ये सहभाग नोंदवला त्यामध्ये मूक अभिनय,एकांकिका,मेहंदी, रांगोळी,कथाकथन, वादविवाद, स्थळ छायाचित्रण, व्यंगचित्रकला,पोस्टर पेंटिंगअशा



विविध प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन प्रचंड मेहनतीने व पूर्ण ताकतीने आपला सहभाग नोंदवला यशस्वी विद्यार्थ्यांचे स्वागत व अभिनंदन कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के हरिभाऊ उपप्राचार्य प्रा.डॉक्टर श्याम पाटील व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक यांच्या उपस्थितीमध्ये घेण्यात आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गो.रा.परडे यांनी केले कार्यक्रमाचे प्रस्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ.एन पी सानप यांनी केले यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन आणि स्वागत करताना मिळवलेल्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के हरिबाबू यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व ज्यांना अपयश आलेले आहे अशा विद्यार्थ्यांनी खचून न जाता पुढील होणाऱ्या युवक महोत्सवामध्ये अधिक ताकतीने सहभाग नोंदवावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली कार्यक्रमाचे आभार प्राध्यापिका डॉ. संजीवनी वाडेकर यांनी केले या गुणगौरव कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी प्रचंड संख्येने उपस्थित होते.महाविद्यालयाने युवक महोत्सव २०२४ मध्ये मिळविलेल्या यशाबद्दल संस्थेचे सचिव प्राध्यापक रवींद्र पाटील चव्हाण ,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के हरिबाबू,महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# भाजपने केजच्या जागेचा पुनर्विचार करून पप्पू कागदेंना उमेदवारी द्यावी

## अन्यथा जिल्ह्यात भाजपला धडा शिकवू ;केजच्या बैठकीत रिपाइं कार्यकर्त्यांचा एल्गार

**केज | सचिन भालेराव**

महायुतीने केजच्या जागे संदर्भात पुनर्विचार करून जागा रिपाइंचे नेते युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांना उमेदवारी देण्यात यावी. या मागणीसाठी रिपाइं कार्यकर्ते आक्रमक झाले असून जर पप्पू कागदे यांना भाजपने उमेदवारी दिली नाही. तर भाजप आणि त्यांच्या उमेदवारांना जिल्ह्यात फिरू देणार नाही. तसेच अनुसूचित जातींच्या आरक्षणाच्या मुद्द्याला हरताळ फासणाऱ्या मुंदडा परिवाराला राजकारणातून हद्दपार करू. असा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आणि भाजप आणि त्यांच्या नेत्या विरुद्ध प्रचंड आक्रोश व्यक्त केला आहे. केज विधान सभेसाठी ना. रामदास आठवले यांनी पप्पू कागदे यांच्या नावाची घोषणा केलेली असताना देखील महायुतीने परस्पर उमेदवारी जाहीर करून मित्र पक्ष रिपांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचा काम केले. या बाबत रिपाइं कार्यकर्त्यात प्रचंड प्रमाणात नाराजी आणि खदखद आहे. त्या निमित्त भाजपने त्यांच्या निर्णयाचा फेर विचार करावा अशी भावना व्यक्त केली. तसेच जर भाजपने त्यांचा निर्णय मागे घेतला नाही. तर जिल्ह्यात कमळ फुलणार नाही आणि फुलू देणार नाही. अशा तीव्र भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत. पप्पू कागदे हे जनमानसातील नेतृत्व असून



तळागाळातील सामान्य माणसांच्या अडीअडचणीच्या प्रसंगी ते धावून जातात. त्यांच्या माध्यमातून जिल्हा आणि राज्यात रिपाइंचे प्रचंड मोठी ताकद निर्माण झालेली आहे. वेगवेगळ्या मोर्चे सभा आंदोलने यांच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला न्याय देण्याचे काम केलेले आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी असो की, गायारान हक्क परिषद यांच्या माध्यमातून सर्व समाजाला आणि अठरा पगड जाती धर्माला न्याय देण्याचे काम करीत आहेत. पप्पू कागदे एक.प्रामाणिकणे गेल्या अनेक वर्षा पासून करीत आहेत. केज मतदार संघाचे सक्षम उमेदवार म्हणून त्यांच्या नावाची अनेक वर्षा पासून जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात चर्चा असताना देखील त्यांना डावलले असल्याने मतदार संघात भाजप विरोधात लाट निर्माण झाली आहे.

पप्पू कागदे यांच्या समर्थनार्थ केज रिपाइं कार्यकर्त्यांनी केज तालुका अध्यक्ष दिपक कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली तातडीची बैठक आयोजित केली होती. बैठकीला मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे, जिल्हा संघटक रवींद्र जोगदंड, राजेश सोनवणे, राहूल सरवदे, विकास अरकडे निलेश ढोबळे, दिलीप बनसोडे, गौतम बचुटे यांच्यासह हरेंद्र तुपारे दादाराव धेंडे, गोरोबा बनसोडे, गोरोबा बनसोडे, सूरज काळे, सुरेश गायकवाड, रोहित बचुटे, विनोद शिंदे, शिवाजी बनसोडे, हरीश गायकवाड, विनोद गायकवाड, रघुनाथ ढालमारे, रोहित कांबळे, मधुकर तुपारे, काकासाहेब कांबळे यांच्या तालुक्यातील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

**नमिता मुंदडांना निवडणूक जड जाणार !:-** मराठा आरक्षण आणि ओबीसी आरक्षण यात आमदार मुंदडा यांची भूमिका रिपाइंचे विरोध यामुळे मुंदडा आणि भाजपला जड जाणार असल्याची लक्षणे दिसून येत आहेत.

**कमळ हद्दपार करू कार्यकर्त्यांची भावना :-** बैठकीला जमलेल्या कार्यकत्यांनी अत्यंत तीव्र शब्दात भाजपा आणि जिल्ह्यातील नेतांचा निषेध व्यक्त करून कमळ हद्दपार करू अशा भावना व्यक्त केल्या

**दलितांच्या प्रश्नावर आमदारांची भुमिका काय ? :-** तालुक्यातील दलितांचे स्मशानभूमीचे प्रश्न, गायारान आणि मराठा व ओबीसी आरक्षण या बाबत त्यांची स्पष्ट भूमिका नसल्याने याचा त्यांच्या मतदानावर परिणाम होवू शकतो.

**पप्पू कागदे आश्वासक चेहरा :-** पप्पू कागदे हे जिल्ह्यातील सर्वसमावेशक आणि आश्वासक नेतृत्व असून ओपन, ओबीसी, दलीत, मुस्लिम प्रवर्गातील त्यांना मानणारा प्रचंड वर्ग आहे. त्याचा फायदा त्यांना मिळू शकतो.

भाजपने आम्हाला लोकसभा निवडणुकीच्या वेळी केजची जागा देण्याचे आश्वासन देवून ही आमच्या पाठीत खंजीर खुपसला. याचा बदला घेवून आम्ही मुंदडा यांना हद्दपार करू.-दिपक कांबळे, तालुका अध्यक्ष, केज

# साधा माणूस म्हणून राम शिंदेंचा मार्ग झाला अधिक सुकर

**अहमदनगर | प्रतिनिधी**

पवारांचा नातू म्हणून पाच वर्षापूव स्वीकारल्यानंतर कर्जत- जामखेडकरांच्या मोठ्या अपेक्षा रोहीत पवार यांच्याकडून होत्या. मात्र, प्रत्यक्षात त्या साऱ्या अपेक्षांचा भंग झाला. राज्याचे नेतृत्व करण्याची हवा डोक्यात गेलेले रोहीत पवार हे आता कर्जत जामखेडकरांच्या डोक्यात गेल्यात जमा आहेत. त्यातुनच आपला हक्काचा भूमिपुत्र म्हणून राम शिंदे यांच्यासाठी आता गावागावातील कार्यकर्त्यांनी मोर्चेबांधणी चालवली असल्याचे दिसते.

पाच वर्षापूव रोहीत पवार यांनी या मतदारसंघात उमेदवारी करताना अनेक स्वप्ने दाखवली. शरद पवार यांचा नातू म्हणून जनतेच्या देखील मोठ्या प्रमाणात अपेक्षा निर्माण झाल्या. विशेषत: या मतदारसंघातील एमआयडीसी, कर्जतचा एसटी डेपो, जामखेड पाणी योजना, यासह रद्द झालेली एमआयडीसी अनेक प्रश्न आजही प्रलंबीत आहेत. राज्याच्या विविध प्रश्नांवर बोलणारे रोहीत पवार स्थानिक त्यांच्याच मतदारसंघातील अनेक प्रश्न सोडविण्यात सपशेल अपयशी ठरले असल्याचे लपून राहिलेले नाही. बाजूला ठेवून रोहीत पवार यांनी तरुणाईला हाताशी धरले. मात्र, त्यांचा पवार यांनी फक्त वापरच केल्याचे दिसून येत आहे. गावागावातून यामुळेच त्यांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत असून रोहीत पवार यांना हीच तरुणाई आता जाब विचारू लागली असल्याचे गावागावांमधून दिसून येत आहे.

राम शिंदे हे मागील निवडणुकीत पराभूत झाले. मात्र, त्यांनी मतदारसंघात संपर्क कायम ठेवला. विधान परिषदेवर संधी मिळाल्यानंतर राम शिंदे यांनी मतदारसंघात विकास कामे माग लावण्याचा धडाका लावला. सामान्य कुटुंबातील राम शिंदे हे आता या दोन्ही तालुक्यातील जनतेला आपला माणूस वाटू लागले आहेत. रोहीत पवार यांचा गर्विष्ठ स्वभाव आणि संपर्काचा अभाव यातून कामे माग न लागल्याने जनतेत रोष निर्माण झाला आहे. त्यामुळेच राम शिंदे यांच्यासाठीचा मार्ग अधिक सुकर झाला असल्याचे दिसून येत आहे. राज्यात नेतृत्व करण्यास ते सज्ज झाले असले तरी या दोन्ही तालुक्यातील अनेक प्रश्न आज तसेच पडून आहेत. जनतेच्या अपेक्षांचा भ्रमनिरास झाला आहे. त्यामुळेच रोहीत पवार यांच्या विरोधात या दोन्ही तालुक्यात मोठ्या प्रमाणात वातावरण निर्माण झाले आहे.

# विवेकानंद महाविद्यालयात माजी कर्तबगार विद्यार्थ्यांचा सत्कार

**छत्रपती संभाजीनग | नतिनिधी**

विवेकानंद महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने माजी कर्तबगार विद्यार्थ्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. अध्यक्ष म्हणून इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर सूर्यवंशी, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सोमनाथ वांजरवाडे ,मराठी विभागप्रमुख प्रा.दत्तात्रय डुंबरे उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये प्रा. चंद्रकांत काईट, प्रा. अंकुश सोनवणे आणि स्वप्निल तायडे या माजी विद्यार्थ्यांनी खडतर परिस्थितीत महाविद्यालयात शिक्षण घेऊन पुढील काळात विविध क्षेत्रात संघर्षमय जीवन जगून यश संपादन केले. ते आज शिक्षण, बँक या क्षेत्रामध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहे. प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे यांच्या हस्ते खडतर परिस्थितीतून व अपंगात्वावर मात करून प्राध्यापक झालेल्या अंकुश सोनुने यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक प्रा. ईश्वर अडसूळ यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. विवेक घोलप यांनी, तर आभार प्रा. कविता कुंटे यांनी मानले. या प्रसंगी प्रा.चंद्रकांत काईट, स्वप्नील तायडे (बँक अधिकारी), प्रा. अंकुश सोनुने यांनी आपले मनोगत मांडताना आपल्या गुरू आणि महाविद्यालयाविषयी ऋण व्यक्त केले. यावेळी एमएच्या विद्यार्थ्यांसाठी उजळणी वर्गाचेही आयोजन करण्यात आले होते. समारंभ यशस्वी पार पाडण्यासाठी डॉ.ज्योती चव्हाण, डॉ. अभय मंडलिक, भयवाळ यांनी परिश्रम घेतले.

# ज्ञानाची तहान आणि विचारांनी महान होण्यातच देवत्त्व होय-प्रा.विलासराव तुळे

**श्रीरामपूर | प्रतिनिधी**

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत शिक्षण आणि नोकरी करताना समाधान लाभले. अशा जीवन वाटचालीत ज्ञानाची तहान आणि विचारांनी महान होण्यात खरे देवत्त्व असल्याचा अनुभव आल्याचे मत रयत शिक्षण संस्थेतून सेवानिवृत्त झालेले प्रा. विलासराव शिवाजी तुळे यांनी व्यक्त केले.

येथील श्रीसंत गोरा कुंभार प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष प्रा. विलासराव तुळे यांचा वाचन संस्कृती प्रतिष्ठान, श्रीरामपूर, कराड येथील प्रा. भगवान पाटील, प्रा. पोपटराव काटकर, सातारा येथील कर्मवीर भाऊराव विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजयराव कुंभार इत्यादी मान्यवरांनी केलेल्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यानिमित्ताने वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक,अध्यक्ष डॉ. बाबुराव उपाध्ये



यांनी प्रा. तुळे यांचा सन्मान करून झालेल्या विविध सत्काराबद्दल कौतुक केले. कराड येथील गुरुवर्य प्रा. भगवान पाटील, प्रा. पोपटराव काटकर यांनी तुळे यांच्या कष्टप्रद आणि ज्ञानामय वाटचालीचे कौतुक केले. कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. विजयराव कुंभार म्हणाले, प्रा.तुळे यांनी सातारा येथे शिक्षण घेतले. राहाता,मंचर, कोळपेवाडी, नगर, बोधेगाव,मोखाडा इत्यादी शाखेत प्रामाणिकपणे मराठी विषयाचे अध्यापन केले. त्याविषयी त्यांचा सत्कार म्हणजे रयतनिष्ठ आणि ज्ञाननिष्ठेचा सत्कार होय, असे गौरवोद्गार काढून शाल, बुके,भेटवस्तू देऊन सन्मान केला. याप्रसंगी कुंभार समाज महासंघ महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सतिशदादा दरेकर, प्रदेश उपाध्यक्ष चंद्रकांत कुंभार, रामदास कुंभार, कुंभ विकास साप्ताहिकचे मुख्य संपादक दिगंबर इंगळे पुणे, लक्ष्मण कुंभार,भाऊसाहेब आवडकर, गजानन कोळमकर, विश्वनाथ कोळमकर, अनिल झोजे पुणतांबा तसेच शिऊर येथील गवळी बंधूसह अखिल भारतीय प्रजापती (कुंभकार) कुंभार संघ पदाधिकारी, गुणवंत मान्यवर सत्कारमूर्ती आणि समाज बांधव उपस्थित होते. प्रा. विलासराव तुळे यांनी काठापूर गावातील शिक्षण आणि शिक्षणासाठी केलेल्या भ्रमंतीच्या आठवणी सांगितल्या. गुरुवर्य प्रा.बी. डी. पाटील, डॉ.बाबुराव उपाध्ये इत्यादीसारखे शिक्षक लाभले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जीवनाला योग्य दिशा मिळाली. श्रीरामपूरला स्थायिक होऊन प्रगती करता आली असे अनुभव सांगून अनेकांनी केलेल्या सत्काराबद्दल आभार मानले.

### शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्यावी

# शेतकऱ्यांची मागणी मुसळधार पावसाने पिकांचे आतोनात नुकसान



**खुलताबाद | प्रतिनिधी**

खुलताबाद व परिसरात परतीचा पाऊस झाल्याने त्याचा फटका शेतीपिकांना बसला आहे. शेकडो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. काढणी आलेले सोयाबीन व कापूस भिजून काळवंडला आहे. प्रशासनाने त्वरित पंचनामे करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

बाजार सावंगी महसूल मंडळात उन्हाळी कांद्याचे बियाणे टाकलेल्या शेताला सततच्या पावसाच्या पाण्याचा फटका बसला आहे. त्यामुळे रोपांवर मर पडला. शेतकरी हवालदिल झाले आहेत. बाजार सावंगी गाव व परिसरात झालेल्या मुसळधार पावसाने कापसाची वाती झाल्या, तर सोंगणी करून शेतात ठेवलेली सोयाबीन मका.भिजून त्याला कोम फुटले आहे. या आप्तकालीन परिस्थितीत प्रशासनाने शेतकऱ्यांना हेकटरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी बाजार सावंगी येथील शेतकरी .मुनीर अब्बास शाह . यांच्यासह शेतकऱ्यांनी केली आहे.

# विधानसभा निवडणुकी करिता केज तालुका शिवसेना सज्ज

## उद्धवजी ठाकरे साहेब यांना मुख्यमंत्री करण्यासाठी शिवसैनिकांचा निर्धार

### जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे व तालुकाप्रमुख अशोक जाधव यांनी गद्दारांना जागा दाखवण्याचे केले आवाहन

**केज | प्रतिनिधी**

शिवसेना-उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख मा.उद्धवजी बाळासाहेब ठाकरे युवासेनाप्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब यांच्या आदेशावरून, मराठावाडा संपर्कप्रमुख सुनिल प्रभु साहेब,शिवसेना उपनेत्या प्रा.सुषमा ताई आंधारे,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव, लोकसभा प्रमुख सुनील दादा धांडे ,शिवसेना सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब आंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या उपस्थितीत येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आज बुधवार रोजी केज शिवसेना संपर्क कार्यालय येथे केज तालुका शिवसेना पदाधिकार्यांची व बुथप्रमुखांची महत्वपूर्ण बैठक तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या आयोजनात संपन्न झाली .यावेळी उपस्थित उपजिल्हाप्रमुख दिपक मोराळे, तालुकाप्रमुख अशोक जाधव, युवासेना जिल्हाप्रमुख सोमनाथ गित्ते, जिल्हा समन्वय अनिल देशमुख,जिल्हासचिव रोहित कसबे,जिल्हासहसंघटक दिलीप जाधव,शहरप्रमुख तात्या रोडे, युवासेना तालुकाप्रमुख किशोर घुले, तालुका सचिव सखाराम वायबसे,तालुकासंघटक सुधिर जाधव,लक्ष्मण गलांडे, उपतालुकाप्रमुख सुभाष ठोंबरे,सुरज वाघमारे,शहरसचिव जाहेद शेख, उपशहरप्रमुख पप्पू ढगे,पप्पू कोल्हे, युवासेना शहरप्रमुख अनिकेत गायकवाड, उपतालुकाप्रमुख दिलीप गालफाडे, अश्रफ शेख, दत्ता तांदळे,शहदेव भोसले, ज्ञानेश्वर बोबडे, रामभाऊ पवार, दिलीप खाडे, गणेश निंगुळे, बाळासाहेब कसबे,राजाभाऊ मोटे,विनायक वनवे, आप्पा कांबळे, मधुकर अंधारे,हरिष गिते, अमोल घुले, गोकुळ मोरे,आतम घाडगे, वैजनाथ वाघमारे, शिवाजी इंगळे, बहादुर शेख, राहुल फुके,राम इंगळे,अगंद देशमुख,सह शिवसैनिक उपस्थित होते.



# अहो ताई,तालुक्याचा बाप कोण हे जनता ठरवेल-डॉ.सुजय विखे

## बापाबद्दल नव्हे निष्क्रीय आमदाराबद्दल बोललो;राजकन्येला बोलण्यासाठी भाग पाडणारेच त्यांचा घात करणार





**संगमनेर । प्रतिनिधी**

तालुक्यातील जनतेन तुमचा चाळीस वर्षाचा कारभार पाहायला त्यामुळे तालुक्याच्या आमदारांच्या निष्क्रीयतेवर बोललो तर राग यायचे कारण काय अहो ताई,लोकाशाही प्रक्रीयेत मायबाप जनता बाप असते.तालुक्याचा बाप कोण हे येत्या निवडणुकीत जनता दाखवून देईल असे सडोतोड उतर डॉ सुजय विखे पाटील यांनी दिले.

साकूर येथे आयोजित करण्यात आलेल्या युवा संकल्प मेळाव्यात डॉ सुजय विखे यांनी पुन्हा एकदा आ.बाळासाहेब थोरात यांचा नामोल्लेख टाळून त्यांच्यावर टिकास्त्र सोडले.चाळीस वर्षे सर्व सतास्थान असूनही पठार भागाच्या जनतेला पाणी मिळवून देता आले नाही.या भागात युवकांना रोजगाराच्या संधी दिल्या नाहीत.या निष्क्रीयतेवर बोललो तर तुम्ही थेट बाप काढाला.आमच्या भागात येवून आमच्या वडीलावर वाटेल तशी टिका केली.पण आम्ही संयम दाखवून राजकारण करणारी माणस आहोत.सामान्य माणसाला न्याय देण्यासाठी विखे पाटील परीवाराने नेहमीच आवाज उठवला.या तालुक्यातील प्रस्थापितांच्या विरोधात आवाज उठवायला आम्ही आलो आहोत.साकूरची सभा प्रस्थापितांच्या विरोधातील परीवर्तनाची नांदी असल्याचा इशारा डॉ विखे पाटील यांनी दिला.

वर्षवर्षानुवर्षे ज्या जनतेन निवडून दिले त्यांचा बाप तालुक्याच्या राजकन्या काढायला निघाल्या.पण कोणाच्या बापाबद्दल नाही तर तालुक्याच्या आमदाराच्या निष्क्रीयेतवर बोलल्याचा टोला लगावून विखे पाटील म्हणाले की लोकशाही प्रक्रीयेत जनता मायबाप असते.येणार्या विधानसभा निवडणुकीत जनता ठरवेल तालुक्याचा बाप कोण आहे.पण ताईच्या गाडीत बसणारे त्यांना बोलायला भाग पाडत आहेत.ताईच्या गाडीत बसलेले लोकच त्यांचा घात करणार असल्याचे सूचक वक्तव्य त्यांनी केलै. तालुक्यातील युवकांनी मनगटातील ताकद दाखवून या प्रस्थापितांना धडा शिकवावा असे आवाहन करून आमचा आवाज तुम्ही दाबू शकत नाही जेवढा आवाज दाबाल तेवढा तुमच्या घरापर्यत येईल असे डॉ विखे यांनी ठणकावून सांगितले.

राज्यात पुन्हा महायुतीचेच सरकार येणार असल्याने तालूक्याचा आमदार सुध्दा महायुतीचा आपल्याला करायचा आहे.उमेदवार कोणी असो डॉ सुजय विखे तुमच्या प्रश्नासाठी बांधील असल्याची ग्वाही त्यांनी दिली.याप्रसंगी बाबासाहेब कुटे गुलाबराजे शेळके यांच्यासह अनेक सरपचांनी भाजप मध्ये प्रवेश करून महायुतीला पाठिंबा दिला.

# ६० वर्षांत कुणा मंत्र्यांनी आणला नाही तेवढा निधी भरतशेठ गोगावलेंनी महाड मतदारसंघात आणला

**रायगड । प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात गेल्या ६० वर्षांत कुणा मंत्र्यालाही आणता आला नाही एवढा मोठा निधी महाड मतदारसंघात आमदार भरतशेठ गोगावलेंनी आणल्याचा दावा त्यांनी केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या विश्वासार्हतेमुळे हे शक्य झाले, असे सांगत गोगावलेंनी शिंदे यांचे कौतुक केले.

मुख्यमंत्री शिंदे फाईलींवर विश्वासाने सही करणारे नेते आहेत. ते घरात बसून काम करणारे नाहीत, तर रस्त्यावर उतरून जनतेत असतात. तुम्हाला असा मुख्यमंत्री हवा की घरात बसणारा? असा सवाल गोगावलेंनी मुंबईवासीयांच्या महाड तालुक्यातील नालासोपारा येथील मेळाव्यात उपस्थितांना विचारला.

महाड तालुक्यातील मुंबईवासीयांचा भव्य मेळावा नालासोपारा येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, माजी राजिप सदस्य जितेंद्र सावंत आणि खाडीपट्टा संपर्कप्रमुख एकनाथ सुकूम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गोगावले यांनी मंत्रीपद मिळण्याची संधी असतानाही त्याग केला, हे त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले. महायुती सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात माझे मंत्रीपद फायनल झाले होते. पण पक्षातील १० दावेदार आणि फक्त ९ मंत्रीपदे यामुळे मुख्यमंत्री धर्मसंकटात आले. त्यावेळी मी तानाजी मालुसरे यांच्या त्यागाचा आदर्श घेत मंत्रीपदाचा त्याग केला. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे माझ्या शब्दाला आजही मान देतात, असे गोगावले म्हणाले.

गोगावलेंनी मतदारसंघातील लोकांच्या सुखदु:खात कायम धावून जाण्याचा आपला पायंडा कायम ठेवल्याचे सांगितले. मी कुठेही असलो तरी माझ्या मतदारसंघातील एखाद्या नागरिकावर प्रसंग ओढवला की तातडीने त्याच्या मदतीसाठी धावतो. संपत्तीने मी मोठा नसतो, पण माझ्या घराबाहेर दररोज असलेल्या जनतेच्या गर्दीतच माझी खरी संपत्ती आहे, असे ते म्हणाले.

गोगावलेंनी पुढे सांगितले की, तुमचा आमदार मनाने मोठा आहे, जो सकाळी ७ वाजल्यापासून रात्री २ वाजेपर्यंत जनता दरबार घेतो. जनतेच्या सुखदु:खात सहभागी होणारा आमदार हवा की घरात बसून सत्ता भोगणारा नेता हवा, याचा विचार जनतेने करावा.

महाड मतदारसंघातील विकासकामांची यादी लवकरच १५० पानी पुस्तिकेद्वारे जनतेला देण्यात येणार असल्याचे गोगावले यांनी जाहीर केले. विरोधकांनी यात कोणतेही काम झाले नाही, असे सिद्ध करून दाखवावे, असे त्यांनी आव्हान दिले. दासगाव येथील गोठे पुलाला लोकनेते स्वर्गीय शांतारामभाऊ फिलसे यांचे नांव देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

गोगावले भाषण देत असताना वातावरणात अचानक पावसाची चिन्हे दिसू लागली. त्यावेळी त्यांनी उपस्थितांना जागेवरून उठू नये, असे आवाहन केले. भाषण संपेपर्यंत पाऊस थांबल्याने, वरुणराजानेही आपल्याला साथ दिली, असे गोगावले यांनी सांगितले. या मेळाव्यात शिवसेनेच्या संपर्कप्रमुख, जिल्हाप्रमुख, महिला आघाडी, तालुकाप्रमुख आणि युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह विविध पक्षांतील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. हजारोंच्या संख्येने झालेल्या या मेळाव्यामुळे महाड मतदारसंघातील राजकीय वातावरण तापले आहे.

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत वीट विद्यालयाचा ऐतिहासिक विजय

**सोलापूर । प्रतिनिधी**

शुक्रवारी, १८ ऑक्टोबर २०२४ रोजी जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर आयोजित जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, वीटच्या १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींनी नवा इतिहास रचला. मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात वेळापूरच्या लोकविकास प्रशालेवर ८ गुणांनी विजय मिळविला, तर मुलींच्या संघाने वाडी कुरोली, ता. पंढरपूरच्या वसंतराव काळे प्रशाला संघावर २ गुणांनी विजय मिळवला.



एकाच प्रशालेतील दोन्ही संघांनी जिल्हास्तरावर विजय मिळवून एकत्रितपणे विक्रम रचला आहे. ३२ वर्षांनंतर वीट विद्यालयाला हे यश मिळाल्यामुळे ग्रामस्थांनी खेळाडूंची गावातून जंगी मिरवणूक काढली. मिरवणूकीनंतर खेळाडूंचा व पर्यवेक्षक, तसेच क्रीडाशिक्षक श्री दादासाहेब बरडे सर, श्री विनोद ढेरे सर आणि श्री जगन्नाथ जाधव सर यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. शाळेच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री देविदास ढेरे सर, संचालक डॉ. राजेश बरडे साहेब, प्रशालेचे मुख्याध्यापक संजय कोळेकर सर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मनापासून अभिनंदन केले आणि विभाग स्तरासाठी शुभेच्छा दिल्या. वीट विद्यालयाच्या या यशामुळे स्थानिक खेळाच्या क्षेत्रात एक नवीन ऊर्जा संचारली आहे, आणि खेळाडूंनी पुढील स्पर्धांमध्येही यश मिळवण्याची आशा व्यक्त केली आहे.

# शिवाजी कर्डिलेंना उमेदवारी जाहीर होताच शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील कुलदीप पवार आणि नरेंद्र शेटे यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह माजी मंत्री शिवाजी कर्डिले यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्डिले यांना उमेदवारी जाहीर होताच मतदारसंघातील अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये सामील होत आहेत.

माजी मंत्री कर्डिले हे हक्काचा माणूस म्हणून ओळखले जात असल्यामुळे त्यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. या प्रवेश सोहळ्यात सुरेश बानकर, नंदू डोळस, भैय्या शेळके, ज्ञानेश्वर भिंगारदे, रवी म्हसे, सचिन शेटे, उमेश शेळके, अभिजित लिप्टे, भिमराज आव्हाड, रंभाजी गावंडे, बाबासाहेब शिंदे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश होता.

राहुरी, पाथर्डी आणि नगर मतदारसंघातील युवकांनी मोठ्या प्रमाणावर भाजपमध्ये प्रवेश केला असून, यामुळे मतदारसंघात राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्राजक्त तनपुरे यांच्या बालेकिल्ल्यातूनच कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तोंडावर कर्डिलेंना पाठिंबा दिल्यामुळे विरोधकांमध्ये खळबळ उडाली आहे.

या प्रवेश सोहळ्यादरम्यान मच्छिंद्र हरीश्चंद्रे, भाऊसाहेब जाधव, गौतम माळी, अमोल उल्हापुरे, भैय्या बोरूनडे, लक्ष्मण खाचकर, रवी बलमे, कृष्णा मोटे, लाला शेडगे, पवा गिरासे, श्रीनाथ शेटे, मनोज बाचकर, अविनाथ तोडमल, गणेश रंगले, हेमंत मकासरे, रवेन बाचकर, अविनाश चोपडे, जयपाल गिरासे, युवराज बर्डे, जुनेदभाई इनामदार आणि दीपक पेंढारे यांचा समावेश होता. कर्डिलेंच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने झालेल्या या प्रवेशामुळे विधानसभा निवडणुकीत भाजपचे संख्याबळ वाढले असून, कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे.

# संदीप नाईक यांचा शरद पवार गटात प्रवेश जयंत पाटील यांच्याकडून उमेदवारीचे संकेत

## वडील युतीचे तर मुलगा आघाडीचा उमेदवार?



**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रातील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय खलबते सुरू असून पक्ष बदलण्यासाठी नेत्यांच्या उड्या देखील सुरू आहेत. यातच आता भाजपला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. भाजपचे नवी मुंबई जिल्हा भाजप अध्यक्ष संदीप नाईक यांनी आज शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या हस्ते नाईक यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.विधानसभा निवडणुकीसाठी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची यादी लवकरच जाहीर होणार आहे. मात्र, त्याआधीच मी संदीप नाईकांच्या हातात तुतारी दिली असल्याचे सूचक वक्तव्य प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केले. या मतदारसंघात तुमच्या मनातील उमेदवार देऊ असे आश्वासनही त्यांनी उपस्थितांना दिले.संदीप नाईक यांचे वडील गणेश नाईक हे भाजपचे मोठे नेते असून पक्षाने त्यांना ऐरोली विधानसभा मतदारसंघातून तिकीट दिले आहे. तर संदीप यांना नवी मुंबईतील बेलापूर मतदारसंघातून निवडणूक लढवायची आहे. मात्र पक्षाने या जागेवरून विद्यमान आमदार मंदा म्हात्रे यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे.अशा स्थितीत तिकीट न मिळाल्याने संदीप नाईक नाराज असून त्यांना बेलापूरची जागा शरद पवार गटाने देऊ केल्याचे मानले जात आहे. शरद पवार यांच्या आश्वासनावर विश्वास ठेवून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये शरदचंद्र पवार गटात प्रवेश केला आहे. संदीप नाईक हे राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार गटाच्या काही दिवसांपासून संपर्कात आहेत. मंगळवारी संदीप नाईक यांनी आपल्या समर्थकांसह जयंत पाटील यांच्या हस्ते प्रवेश केला. त्यामुळे त्यांना उमेदवारी देण्याची घोषणा देखील होण्याची शक्यता आहे.गणेश नाईक आणि संदीप नाईक यांचा नवी मुंबईत बराच प्रभाव असल्याचे बोलले जाते. नवी मुंबईतील ऐरोली मतदारसंघातून भाजपने संदीप नाई यांचे वडील गणेश नाईक यांना उमेदवारी दिली आहे. संदीप नाईक यांची मनधरणी करण्यासाठी भाजपकडून प्रयत्न सुरू असल्याचेही समोर आले आहे. मात्र, ते माघार घेण्याच्या तयारीत नव्हते.

# महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची दुसरी यादी जाहीर:माहीममधून अमित ठाकरेंना, तर वरळीतून संदीप देशपांडेंना उमेदवारी



महाराष्ट्र नवनिर्माण सेना

प्रसिद्धीसाठी :-

दिनांक :- २२/१०/२०२४.

यांसी सस्नेह जय महाराष्ट्र !

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष मा.श्री.राजसाहेब ठाकरे यांच्या आदेशाने महाराष्ट्र विधानसभा २०२४ च्या ४५ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात येत असून सर्वांनी याची नोंद घ्यावी.

| क्रमांक | विधानसभा अनुक्रमांक | विधानसभेचे नाव | उमेदवाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | १४४ | कल्याण ग्रामीण | श्री.प्रमोद (राजु) रतन पाटील |
| २ | १८१ | माहीम | श्री.अमित राज ठाकरे |
| ३ | १५७ | भांडुप पश्चिम | श्री.शिरीष गुणवंत सावंत |
| ४. | १८२ | वरळी | श्री.संदीप सुधाकर देशपांडे |
| ५ | १४८ | ठाणे शहर | श्री.अविनाश जाधव |
| ६ | १३९ | मुरबाड | श्रीमती संगिता चेंदवणकर |
| ७ | २१० | कोथरुड | श्री.किशोर शिंदे |
| ८ | २१३ | हडपसर | श्री.साईनाथ बाबर |
| ९ | २११ | खडकवासला | श्री.मयुरेश रमेश वांजळे |
| १० | १५४ | मागाठाणे | श्री.नयन प्रदीप कदम |
| ११ | १५२ | बोरीवली | श्री.कुणाल माईणकर |
| १२ | १५३ | दहिसर | श्री.राजेश येरुणकर |
| १३ | १५९ | दिंडोशी | श्री.भास्कर परब |
| १४ | १६४ | वर्सोवा | श्री.संदेश देसाई |
| १५ | १६० | कांदिवली पूर्व | श्री.महेश फरकासे |
| १६ | १६३ | गोरेगांव | श्री.विरेंद्र जाधव |
| १७ | १६१ | चारकोप | श्री.दिनेश साळवी |
| १८ | १५८ | जोगेश्वरी पूर्व | श्री.भालचंद्र अंबुरे |
| १९ | १५६ | विक्रोळी | श्री.विश्वजित ढोलम |
| २० | १६९ | घाटकोपर पश्चिम | श्री.गणेश चुक्कल |
| २१ | १७० | घाटकोपर पूर्व | श्री.संदीप कुलथे |

पान क्र २..

राजगड मध्यवर्ती कार्यालय :- मातोश्री टॉवर्स, बी/२०२, २रा मजला, पद्माबाई ठक्कर मार्ग, माटुंगा (प.), मुंबई - ४०००१६. दूरध्वनी :- २४३३३५११/६११ फॅक्स :- २४३३३८११ | ई मेल :- mnsmedia9@gmail.com



महाराष्ट्र नवनिर्माण सेना

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | १७३ | चेंबूर | श्री.माऊली थोरवे |
| २३ | १६८ | चांदिवली | श्री.महेंद्र भानुशाली |
| २४ | १७१ | मानखुर्द -शिवाजीनगर | श्री.जगदीश खांडेकर |
| २५ | १५० | ऐरोली | श्री.निलेश बाणखेले |
| २६ | १५१ | बेलापूर | श्री.गजानन काळे |
| २७ | १४९ | मुंब्रा - कळवा | श्री.सुशांत सूर्यराव |
| २८ | १३२ | नालासोपारा | श्री.विनोद मोरे |
| २९ | १३६ | भिवंडी पश्चिम | श्री.मनोज गुळवी |
| ३० | १४५ | मिरा – भाईंदर | श्री.संदीप राणे |
| ३१ | १३५ | शहापूर | श्री.हरिश्चंद्र खांडवी |
| ३२ | २६४ | गुहागर | श्री.प्रमोद गांधी |
| ३३ | २२७ | कर्जत – जामखेड | श्री.रवींद्र कोठारी |
| ३४ | २३१ | आष्टी | श्री.कैलास दरेकर |
| ३५ | २२८ | गेवराई | सौ.मयुरी बाळासाहेब म्हस्के |
| ३६ | २३९ | औसा | श्री.शिवकुमार नागराळे |
| ३७ | १३ | जळगांव शहर | डॉ.अनुज पाटील |
| ३८ | ७५ | वरोरा | श्री.प्रवीण सूर |
| ३९ | २५१ | सोलापूर दक्षिण | श्री.महादेव कोगनुरे |
| ४० | २७३ | कागल | श्री.रोहन निर्मळ |
| ४१ | २८७ | तासगांव -कवठे महाकाळ | श्री.वैभव कुलकर्णी |
| ४२ | २२६ | श्रीगोंदा | श्री.संजय शेळके |
| ४३ | ५० | हिंगणा | श्री.विजयराम किनकर |
| ४४ | ५३ | नागपूर दक्षिण | श्री.आदित्य दुरुगकर |
| ४५ | २४८ | सोलापूर शहर -उत्तर | श्री.परशुराम इंगळे |

आपला नम्र,

नितीन सरदेसाई

नेते - महाराष्ट्र नवनिर्माण सेना

राजगड मध्यवर्ती कार्यालय :- मातोश्री टॉवर्स, बी/२०२, २रा मजला, पद्माबाई ठक्कर मार्ग, माटुंगा (प.), मुंबई - ४०००१६. दूरध्वनी :- २४३३३५११/६११ फॅक्स :- २४३३३८११ | ई मेल :- mnsmedia9@gmail.com

**मुंबई (वृत्तसंस्था)**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या यादीत मनसे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना देखील उमेदवारी देण्यात आली आहे. अमित ठाकरे यांना माहीम विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे.

सोमवारी मनसेकडून राजू पाटील आणि अविनाश जाधव यांना उमेदवारी देण्यात आली होती. राजू पाटील कल्याण ग्रामीणमधून तर अविनाश जाधव ठाण्यातून विधानसभा निवडणूक लढणार आहेत. मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी ही घोषणा केली आहे. वरळीत ठाकरे गटाचे आदित्य ठाकरे विरुद्ध मनसेचे संदीप देशपांडे यांच्यात लढत रंगणार आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी याआधी बाळा नांदगावकर (शिवडी, मुंबई), दिलीप धोत्रे (पंढरपूर), संतोष नागरगोजे (लातूर ग्रामीण), बंडू कुटे (हिंगोली विधानसभा), मनदीप रोडे (चंद्रपूर), सचिन भोयर (राजुरा), राजू उंबरकर (यवतमाळ) हे उमेदवार घोषित केले होते.दरम्यान, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत महायुतील बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता. काही उमदेवारांसाठी त्यांनी सभा देखील घेतल्या होत्या. मात्र, लोकसभा निवडणुकीत महायुतीला महाराष्ट्रात अपेक्षित यश मिळाले नाही. त्यानंतर राज ठाकरे यांनी आता विधानसभेसाठी स्वबळाचा नारा दिला आहे. राज ठाकरे महायुती, महाविकास आघाडी तसेच इतर कोणत्याही पक्षाला देणार नसल्याचे राज ठाकरे यांनी मागेच जाहीर केले. राज्यात विधानसभेची रणधुमाळी सुरू आहे. सर्व राजकीय पक्षांनी कंबर कसली आहे. यंदाच्या विधानसभेला महायुती, महाविकास आघाडी, परिवर्तन महाशक्ती या तीन मोठ्या आघाड्या असून इतर काही पक्ष एकटे लढत आहेत. त्यामुळे यंदाची निवडणूक चुरशीची होणार असल्याचे दिसून येत आहे.



# देवीचा माळ येथील मूकबधिर शाळेला उपक्रमशील शाळा पुरस्कार प्रदान

**सोलापूर । प्रतिनिधी**

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था, बार्शी यांच्या वतीने राज्यस्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कार २०२४ श्री जगदंबा कमला भवानी मूकबधिर निवासी विद्यालय, श्री देवीचा माळ, करमाळा यांना प्रदान करण्यात आला.

या शाळेची निवड विविध निकषांवर करण्यात आली आहे, ज्यामध्ये शाळेने राबविलेल्या उपक्रमांची यादी, विद्यार्थ्यांना पुरवल्या जाणाऱ्या सोयीसुविधा, सामाजिक कार्यातील योगदान, शाळेला मिळालेले विविध पुरस्कार, तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा समावेश आहे.




यावेळी आयुष्य व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्राचे डॉ. संदीप तांबारे, नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, अजित कुंकलोळ, डॉक्टर रामचंद्र जगताप यांसारख्या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. संस्थेचे सचिव चित्रसेन पाथरूट सर, मुख्याध्यापक दत्तात्रय काळे, तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्काराबद्दल संत दामाजी अपंग सेवा मंडळ, मंगळवेढा संस्थेच्या अध्यक्षा सुशीला पाथरूट मॅडम, सचिव चित्रसेन पाथरूट सर व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागनाथ पाथरूट सर यांनी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांना विशेष कौतुक केले.

# राज आदेश अंतिम राहिल; मनसेने कायमचं सर्वाजानिक हिताचीच मागणी केली–घोलप

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा माढा मतदारसंघातील आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) करमाळा तालुका व शहर यांच्या सर्व अंगीकृत संघटनांनी स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्ष प्रमुख राजसाहेब ठाकरे यांचे आदेश अंतिम राहतील. संजय (बापु) घोलप, मनसे तालुकाध्यक्ष, म्हणाले की, मनसेने सदैव दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्व सामान्य जनतेच्या हिताची मागणी केली आहे.




आगामी विधानसभेत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आपली ताकद दाखवून देईल. पक्ष स्थापनेपासून मनसे पदाधिकाऱ्यांनी सामान्य जनतेसाठी समाजसेवक म्हणून कार्य केले आहे. त्यांनी मताचा विचार न करता सदैव समाजासाठी काम केले आहे.

ज्यांनी मतदारसंघातील चांगले काम केले, त्यांचे कौतुक केले आणि ज्यांनी चुकीचे काम केले, त्यावर निर्भयपणे उघडपणे विरोध केला. आमचे पक्ष प्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या विचारावर काम करत आहोत, आणि हे काम करताना आमचे मनसे नेते दिलीप बापु धोत्रे आणि जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांचे मार्गदर्शन आम्हाला मिळत आहे. आम्ही राजसाहेब यांचे हात बळकट करण्यासाठी कार्यरत राहू, आणि त्यांनी हाक दिली तर उपस्थित राहू. करमाळा तालुक्यातील आणि शहरातील प्रत्येक नागरिकांच्या प्रश्नांवर आणि विविध सामाजिक घटकांवर मनसेची साथ कायम राहिली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत आमची ताकद स्पष्टपणे दिसून येईल, असे मत संजय घोलप यांनी व्यक्त केले.

# माजी आ.जगताप यांनी राष्ट्रवादीची उमेदवारी नाकारली,आता पुढील भूमिकेकडे लक्ष

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळ्याचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या करमाळा विधानसभेसाठी उमेदवारी देऊ केली होती. परंतु जगताप यांनी ती उमेदवारी नाकारली आहे, असे खात्रीलायक वृत्त समोर आले आहे.

अजित दादा समर्थक अपक्ष आमदार संजय मामा शिंदे यांनी पक्षाचे उमेदवारी घेणार नसल्याचे सांगितल्यानंतर पवार यांनी जगताप यांना मुंबईत भेटण्यासाठी बोलावले होते. यावेळी, पवार यांनी जगताप यांना करमाळा विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणुकीमध्ये सहभागी होण्यासाठी विचारणा केली. पवार यांनी लाडकी बहीण योजना आणि अंबालिका कारखान्याच्या समर्थनाबाबत जगताप यांना आश्वासन दिले होते.

तथापि, जगताप यांनी स्पष्टपणे सांगितले की, सध्याच्या केंद्र व राज्य शासनाबद्दल जनतेत तीव्र रोष आहे, आणि त्यामुळे ते जनतेच्या विचारांशी प्रतारणा करू शकत नाहीत. त्यांनी जनतेच्या खिशातून जीएसटी आणि अन्य



करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या अनुदानाबद्दलही चिंता व्यक्त केली. जगताप यांनी अजित पवार यांना सुचवले की, आपल्या समर्थकांनी देखील उमेदवारी नाकारली आहे, त्यामुळे त्यांनी राजकीय रसद पुरवून देखील एकनिष्ठेने राहण्याबद्दल गांभीर्याने विचार करावा.

यांनंतर, अजित पवार यांनी करमाळा दौरा केला, मात्र जगताप यांचा नामोल्लेख असताना देखील ते या दौऱ्यात अनुपस्थित राहिले. या घडामोडींमुळे जगताप यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गेल्या वर्षी, करमाळा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मोहिते पाटील यांच्यामुळे बिनविरोध निवड झाली होती, आणि त्यानंतर जगताप यांची मोहिते पाटील व माजी आमदार नारायण पाटील यांच्याशी जवळीक वाढली आहे. लोकसभा निवडणुकीत जगताप गटाने मोहिते पाटील यांना पाठिंबा दिला होता. जगताप यांच्या आगामी भूमिकेवर विधानसभा निवडणुकीचे भविष्य अवलंबून आहे, कारण जगताप कुटुंबाने आतापर्यंत १६ निवडणुका लढविल्या असून, यामध्ये ११ वेळा विजयी झाले आहेत. या सर्व मुद्द्यांवर जगताप यांना विचारले असता, त्यांनी सांगितले की, तालुक्याच्या विकासासाठी आणि कार्यकर्त्यांच्या हितासाठी योग्य वेळी योग्य निर्णय जाहीर करतील.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे मतदार जनजागृती फेरी संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे करमाळा माढा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड, तहसीलदार शिल्पा ठोकडे, आणि गटशिक्षणाधिकारी जयवंत नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी काढण्यात आली.

मुख्याध्यापक संतोष पोतदार यांच्या नेतृत्वात आयोजित या फेरीत पालक, विद्यार्थी, आणि शिक्षक अनुराधा शिंदे यांचे समवेत विविध घोषणांची देवाणघेवाण करण्यात आली. फेरी दरम्यान, उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी मतदान जागृती संदर्भात घोषणांची घोषणा केली. यामध्ये शिवाजी नाळे, हनुमंत येळे, अक्षय नाळे, अच्युत नाळे, योगेश नाळे, स्वप्नाली नाळे, ज्ञानेश्वरी नाळे, राधिका




नाळे, आर्या नाळे, मोनिका नाळे, सृष्टी बंडगर, नवनाथ येळे, आणि अमर बागडी हे सर्व उपस्थित होते. या फेरीने मतदार जागृतीसाठी महत्वपूर्ण कार्य केले असून, सर्व नागरिकांनी मतदानाच्या प्रक्रियेत सक्रिय भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# निवडणूक निरीक्षक ग्यानचंद जैन यांची माध्यम कक्षास भेट

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेल्या माध्यम कक्षास निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानचंद जैन यांनी भेट देऊन माहिती घेतली. श्री.जैन यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू लाकुडजोडे, जिल्हा माहिती अधिकारी तथा माध्यम कक्षाचे समन्वयक अधिकारी अधिकारी डॉ. किरण मोघे, माहिती अधिकारी अमोल महाजन आदी उपस्थित होते.



श्री.जैन यांनी माध्यम संनियंत्रण, जाहिरात प्रमाणिकरण, समाजमाध्यमावरील जाहिरातींचे प्रमाणिकरण, खर्च समित्यांशी साधला जाणारा समन्वय, माध्यम केंद्राचे दैनंदीन कामकाज आदीविषयी माहिती घेतली. दूरचित्रवाणी आणि समाजमाध्यमांवरील जाहिरातींच्या संनियंत्रणासाठी माध्यम कक्षातर्फे करण्यात येणाऱ्या कामकाजाविषयी त्यांनी समाधान व्यक्त केले. माध्यम कक्षात दररोज येणाऱ्या विविध वृत्तपत्रांतील बातम्यांची नोंद घेण्याची आणि जाहिरातींचे अवलोकन करण्याची पद्धत याविषयीदेखील त्यांनी जाणून घेतले.

जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मोघे यांनी माध्यम कक्षाच्या कामकाजाबाबत निवडणूक निरीक्षकांना माहिती दिली.

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया मुक्त, निर्भय वातावरणात पार पाडावी - निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानचंद जैन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

निवडणूक प्रक्रिया निर्भय आणि मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक प्रक्रियेतील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या अत्यंत संवेदनशीलपणे पार पाडत समन्वयाने काम करण्याच्या सूचना निवडणूक खर्च निरीक्षक ग्यानचंद जैन यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात खर्च पथकातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसोबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू लाकुडजोडे उपस्थित होते. श्री. जैन म्हणाले, भारतीय लोकशाहीला जगात महत्व आहे. देशामध्ये आतापर्यंत झालेल्या



निवडणुका मुक्त व निर्भय वातावरणात पार पाडल्या गेल्या. भारतीय लोकशाहीला अधिक मजबूत करण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी एकसंघपणे तसेच जबाबदारीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.विधानसभा निवडणुकीमध्ये उमेदवाराला ४० लक्ष रुपयांपर्यंत खर्च करण्याची मुभा आहे. उमेदवाराच्या प्रत्येक खर्चावर बारकाईने नजर ठेवावी. ईएसएमएस प्रणालीचा प्रभावीपणे वापर करत अवैध मद्य, रोकड वाहतुकीवर स्थापन करण्यात आलेल्या विविध पथकांनी करडी नजर ठेवावी. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचा प्रत्येक खर्च नोंद होईल, यादृष्टीने सर्व पथकांनी काम करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.बैठकीस निवडणुक खर्च निरीक्षणासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077